# जिल्हा निवड समिती, यवतमाळ
# तलाठी भरती लेखी परीक्षा-२०१४

**प्र.१. आम्लाची संहती दर्शविणारी pH मापनश्रेणी कोणी तयार केली?**

(१) निल्स बोहर (२) थॉम्पसन (३) सोरेन (४) चॅडविक

**प्र.२. सूक्ष्मदर्शकाचा शोध प्रथम कोणी लावला?**

(१) एडिसन (२) झकॅरिअस जॉन्सन (३) रॉबर्ट हूक (४) रॉबर्ट ब्राऊन

**प्र.३. महाराष्ट्र राज्याचा दुसरा मानव विकास अहवाल कोणत्या वर्षी प्रकाशित झाला?**

(१) २००२ (२) २००७ (३) २०१२ (४) २०१४

**प्र.४. 'गरिबी हटाओ' ही घोषणा कोणत्या योजनेत करण्यात आली?**

(१) चौथी (२) पाचवी (३) सहावी (४) सातवी

**प्र.५. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत वरीलपैकी एकही नाही (None of the Above) नोटा (NOTA) चा वापर करणारे पहिले घटकराज्य कोणते?**

(१) गुजरात (२) मध्यप्रदेश (३) महाराष्ट्र (४) राजस्थान

**प्र.६. संयुक्त राष्ट्रांनी मानवाधिकारांचा वैश्विक जाहीरनामा केव्हा स्वीकारला?**

(१) २४ ऑक्टोबर १९४५ (२) १० डिसेंबर १९४८

(३) २७ डिसेंबर १९४५ (४) ३० जानेवारी १९४८

**प्र.७. खालीलपैकी कोणत्या देशात राजकीय पक्षांवर बंदी नाही?**

(१) कतार (२) ओमान

(३) सिरिया (४) संयुक्त अरब अमिरात

**प्र.८. पुढील वाक्यातील क्रियापदाचा अर्थ ओळखा. 'आता पाऊस थांबावा.'**

(१) आज्ञार्थ (२) स्वार्थ (३) विध्यर्थ (४) संकेतार्थ

**प्र.९. अधोरेखित शब्दयोगी अव्यय कोणत्या विभक्ती प्रत्ययाचे काम करते?**
**सरला माधुरी पेक्षा उंच आहे.**

(१) तृतीया (२) पंचमी (३) सप्तमी (४) षष्ठी

**प्र.१०. द्वितीया व चतुर्थी विभक्तीचे कारकार्थ अनुक्रमे कोणते आहेत?**

(१) कर्ता व संप्रदान (२) संबंध व अधिकरण (३) कर्म व संप्रदान (४) कर्म व अपादान

प्र.११. **उपसर्गघटित शब्द म्हणजे काय?**
(१) उपसर्ग निघून गेलेले शब्द.
(२) प्रत्यय लागून बनलेले शब्द.
(३) धातूला प्रत्यय लागल्याने बनलेले शब्द.
(४) शब्दांच्या पूर्वी उपसर्ग लागून तयार होणारे शब्द.

प्र.१२. **'बायकोचा नवऱ्यावर विश्वास हवा.' अधोरेखित शब्दाची उपयोजित जात ओळखा.**
(१) धर्मीवाचकनाम (२) भाववाचकनाम (३) विशेषनाम (४) भरवसा

प्र.१३. **पुढील वाक्यातील उद्देश्य व विधेय ओळखा. – 'माझे वडील आज परगावी गेले.'**
(१) उद्देश्य – माझे, विधेय – आज परगावी गेले.
(२) उद्देश्य – माझे वडील आज, विधेय – परगावी गेले.
(३) उद्देश्य – माझे वडील, विधेय – आज परगावी गेले.
(४) उद्देश्य – परगावी गेले, विधेय – माझे वडील

प्र.१४. **उपमेय हेच उपमान आहे अशी कल्पना जेथे असते तिथे कोणता अलंकार असतो?**
(१) उपमा (२) उत्प्रेक्षा (३) रूपक (४) व्यतिरेक

प्र.१५. **'गांधीजी सत्याग्रह करतात' या वाक्याचा प्रकार ओळखा.**
(१) केवल वाक्य (२) स्वार्थी वाक्य (३) विधानार्थी वाक्य (४) वरील सर्व

प्र.१६. **'इतिश्री करणे' म्हणजेच ......**
(१) श्रीगणेशा करणे (२) सुरुवात करणे (३) शेवट करणे (४) मध्ये थांबणे

प्र.१७. **विधानार्थी वाक्याच्या शेवटी कोणते विरामचिन्ह येते?**
(१) प्रश्नचिन्ह (२) उद्गारवाचक चिन्ह (३) पूर्णविराम (४) स्वल्पविराम

प्र.१८. **संयुक्त वाक्याचा प्रकार ओळखा – 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे.'**
(१) समुच्चयबोधक (२) विकल्पबोधक (३) न्यूनत्वबोधक (४) परिणमबोधक

प्र.१९. **शेजारपाजार हा शब्द ...... या प्रकारात मोडतो.**
(१) अभ्यस्त (२) अनुकरणवाचक (३) तत्सम (४) देशी

प्र.२०. **पुढील शब्दातील सिद्ध शब्द ओळखा.**
(१) उप (२) अनु (३) ता (४) ये

प्र.२१. **पुढीलपैकी मराठी प्रत्यय लागून झालेली शब्दसाधिते कोणती?**
(१) उनाडकी, भांडखोर, वेडसर (२) यादव, राघव, सौभद्र
(३) महत्त्व, जडत्व, धनवान (४) उत्कंठित, कुलीन, नवीन

प्र.२२. **'उषःकाल होता होता, काळरात्र झाली' – या पंक्तीतून कोणता अर्थ व्यक्त होतो?**
(१) वाच्यार्थ (२) शब्दार्थ (३) व्यंगार्थ (४) यापैकी नाही.

प्र.२३. **'औषधं नलगे मजला' या ओळीत कोणता अलंकार होतो?**
(१) सभंग श्लेष (२) अभंग श्लेष (३) शब्द श्लेष (४) अर्थ श्लेष

**प्र.२४. 'बाळ दररोज शाळेत जातो' – या वाक्याचा अपूर्ण भूतकाळ करा.**

(१) बाळ दररोज शाळेत जात असेल. (२) बाळ दररोज शाळेत गेला.
(३) बाळ दररोज शाळेत जातो. (४) बाळ दररोज शाळेत जात होता.

**प्र.२५. नामाच्या रूपावरून पुरुष अथवा स्त्री जातीचा बोध न होता, त्या दोहोंहून भिन्न जातीचा बोध होतो त्यास ...... म्हणतात.**

(१) पुल्लिंग (२) स्त्रीलिंग (३) नपुसकलिंग (४) शिवलिंग

**प्र.२६. पुढीलपैकी कोणता रस जठराच्या भित्तिकेमध्ये स्त्रावत नाही.**

(१) हायड्रोक्लोरिक आम्ल (२) पेप्सीन
(३) टायलान (४) म्यूकस

**प्र.२७. न्यूटनचा गतीविषयक कोणता नियम संवेग परिवर्तनाचा नियम म्हणून ओळखला जातो?**

(१) पहिला (२) दुसरा (३) तिसरा (४) चौथा

**प्र.२८. प्रतिध्वनी ऐकू येण्यासाठी ध्वनीच्या स्रोतापासून परावर्तनशील पृष्ठभागापर्यंतचे अंतर कमीत कमी किती असले पाहिजे?**

(१) १७ मीटर (२) १७.२ मीटर (३) १७.५ मीटर (४) ३४ मीटर

**प्र.२९. निळ्या लिटमस पेपरला आम्लात बुडविल्यास काय होईल?**

(१) कागद विरघळून जाईल. (२) त्याचा रंग लाल होईल.
(३) रंग बदलणार नाही. (४) आम्लाचे ऊर्ध्वपातन होईल.

**प्र.३०. कर्तरी प्रयोगात कर्ता कोणत्या विभक्तीत असतो?**

(१) प्रथमा (२) संबोधन (३) चतुर्थी (४) सप्तमी

**प्र.३१. पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा. – 'रामाच्याने काम करवते.'**

(१) शक्य कर्मणी (२) नवीन कर्मणी (३) पुराण कर्मणी (४) समापन कर्मणी

**प्र.३२. समासाचा प्रकार ओळखा. – ईश्वरनिर्मित**

(१) नञतत्पुरुष समास (२) तृतीया तत्पुरुष समास
(३) प्रादि समास (४) कर्मधारय समास

**प्र.३३. '<u>कोणी</u> कोणास हसू नये.' – अधोरेखित शब्दाची जात ओळखा.**

(१) प्रश्नार्थक सर्वनाम (२) अनिश्चित सर्वनाम
(३) पुरुषवाचक सर्वनाम (४) दर्शक सर्वनाम

**प्र.३४. 'यमक' हा शब्द कशाशी संबंधित आहे?**

(१) दिशा (२) शब्दालंकार (३) गायन (४) कविता

**प्र.३५. 'सव्यापसव्य' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?**

(१) आजूबाजूला (२) नस्ती उठाठेव (३) हमरीतुमरी (४) अघळपघळ

**प्र.३६. पुढील म्हणीचा अर्थ ओळखा. – विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर**

(१) विंचवाचे ओझे त्याच्या पाठीवर असते. (२) शरीराप्रमाणे आहार घेऊन फिरणे.

(३) गरजेपुरत्या गोष्टी घेऊन फिरणे. (४) नवऱ्यापाठोपाठ बिऱ्हाड येणे.

**प्र.३७. ई–रेव्हेन्यू कोर्ट प्रणालीचे उद्दिष्ट काय आहे?**

(१) महसूल व न्यायालयांना संगणकाने जोडणे.

(२) महसूल कोर्टात चालणाऱ्या सर्व केसेसची कार्यपद्धती संगणकाधारित करणे.

(३) तलाठ्यांना लॅपटॉप देणे.

(४) सर्व महसूल कार्यालयाचे संगणकीकरण करणे.

**प्र.३८. ग्रामपंचायतीत राष्ट्रीयीकृत बँकांची सेवा यवतमाळ जिल्ह्यातील कुठल्या ग्रामपंचायतीत सुरू करण्यात आली?**

(१) परसोडी (२) मांगकिन्ही (३) तळेगाव (४) तिवरी

**प्र.३९. क्रीडासंस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी क्रीडाधोरण जाहीर करणारे पहिले राज्य कोणते?**

(१) गुजरात (२) केरळ (३) आंध्र प्रदेश (४) महाराष्ट्र

**प्र.४०. यवतमाळ जिल्ह्याला महाराष्ट्रातील किती जिल्ह्यांच्या सीमा स्पर्श करतात?**

(१) पाच (२) सहा (३) सात (४) आठ

**प्र.४१. ई–विद्या प्रकल्प राबविणारा राज्यातील पहिला जिल्हा कोणता?**

(१) यवतमाळ (२) वर्धा (३) पुणे (४) गडचिरोली

**प्र.४२. भारतातील पहिली मोनोरेल चालविणारी महिला कोण?**

(१) जुईली भंडारे (२) अमृता मल्होत्रा (३) लक्ष्मी जोसेफ (४) मोनिका पटेल

**प्र.४३. 'ॲडव्हान्टेज विदर्भ' हा उपक्रम विदर्भाच्या कोणत्या क्षेत्रातील विकासासाठी राबविला जात आहे?**

(१) पर्यटन (२) वनविकास (३) उद्योग (४) शेती

**प्र.४४. नवीन निर्माण करण्यात आलेल्या तेलंगणा राज्याचा क्षेत्रफळानुसार भारतात कितवा क्रमांक लागतो?**

(१) १२ वा (२) ११ वा (३) १३ वा (४) ९ वा

**प्र.४५. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना कधी झाली?**

(१) १० डिसेंबर १९९३ (२) २३ एप्रिल १९२६

(३) २३ एप्रिल १९९४ (४) १ मे १९६०

**प्र.४६. सविनय कायदेभंग म्हणजे काय?**

(१) विनंती करून कायद्याचा भंग करणे.

(२) अन्यायी, अत्याचारी कायद्याचा भंग करणे.

(३) अहिंसक मार्गाने अन्यायी कायद्याचा भंग करणे.

(४) जमेल तसा कायदा मोडणे.

प्र.४७. बंगालमध्ये 'द मोहमेडन लिटरसी सोसायटी' या संस्थेची स्थापना कोणी केली?
(१) सर सय्यद अहमद खान (२) अब्दुल लतीफ
(३) नवाब सलिमुल्ला (४) मोहम्मद अली जीना

प्र.४८. आदिवासींच्या विकासासाठी 'कोसबाड प्रकल्प' कोणी स्थापन केला?
(१) ताराबाई मोडक (२) प्रकाश आमटे (३) अनुताई वाघ (४) दामुअण्णा टोकेकर

प्र.४९. 'गोपाळबाबा वलंगकर' या समाजसुधारकाने 'विंटाळ विध्वंसन' या पुस्तकातून कशाचे खंडन केले?
(१) अस्पृश्यता (२) स्त्रियांचा ऋतुस्राव (३) ब्राह्मणी व्यवस्था (४) अस्वच्छता

प्र.५०. भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा ब्रिटिशांनी कधी मंजूर केला?
(१) ३ जुलै १९४७ (२) १८ जुलै १९४७ (३) १५ ऑगस्ट १९४७ (४) १४ ऑगस्ट १९४७

प्र.५१. **Find out whether there is any grammatical error in it-**
(१) A lot of travel delay is caused.
(२) Due to the inefficiency and lack of good management.
(३) On behalf of the railways.
(४) No error.

प्र.५२. **The officer who had neglected to file his income tax returns had to ......**
(१) pay a fine (२) return the files (३) give warning (४) be rewarded

प्र.५३. **Choose the word which best expresses the meaning of the given word - Foray**
(१) Contest (२) Intuition (३) Maraud (४) Rangeg

प्र.५४. **Select the pair which has the same relationship : WAN : COLOUR**
(१) Corpulent : Weight (२) Insipid : Flavour
(३) Pallid : Complexion (४) Enigmatic : Puzzle

प्र.५५. **Choose the word which best expresses the meaning of the given word - Shiver.**
(१) Feel (२) Tremble (३) Move (४) None of above.

प्र.५६. **Select the pair which has the same relationship : Pork : Pig**
(१) Rooster : Chicken (२) Mutton : Sheep
(३) Steer : Beef (४) Lobster : Crustacean

प्र.५७. **Pick out the best one which can complete incomplete stem correctly and meaningfully-**
**Anand stuck up a friendship with Mahesh in just two days means ......**
(१) Anand friendship with Mahesh came to an end recently.
(२) Anand became a friend of Mahesh in less than two days
(३) Anand's friendship with Mahesh lasted for two years.
(४) Anand fixed a deal with Mahesh in two days.

प्र.५८. **Select the pair which has the same relationship - Indigent : Wealthy**

(१) Angry : Rich (२) Native : Affluent

(३) Gauche : Graceful (४) Scholarly : Erudite

प्र.५९. **Exact OPPOSITE of the given word - Mortal**

(१) Immortal (२) Divine (३) Spiritual (४) Eternal

प्र.६०. **Choose the word which best expresses the meaning of the given word - Rescue**

(१) Safety (२) Command (३) Help (४) Defence

प्र.६१. **Exact OPPOSITE of the given word - Helpless**

(१) Fortunate (२) Cheerful (३) Shapely (४) Consistent

प्र.६२. **Select the pair which has the same relationship : GRAIN : SALT**

(१) shard : pottery (२) shred : wood (३) blades : grass (४) chip : glass

प्र.६३. **Exact OPPOSITE of the given word - Mountain**

(१) Plain (२) Valley (३) Precipice (४) Plateau

प्र.६४. **Pick out the most effective word (s) from the given words to fill in the blank to make the sentence meaningfully complete - The American ...... presented his credentials to the President of India.**

(१) Ambassador (२) Delegate (३) Representative (४) Adviser

प्र.६५. **Exact OPPOSITE of the given word - Minor**

(१) Big (२) Tall (३) Heavy (४) Major

प्र.६६. **Select the pair which has the same relationship - Ten : Decimal**

(१) Seven : Septet (२) Four : Quarter (३) Two : Binary (४) Five : Quince

प्र.६७. **Pick out the most effective word (s) from the given words to fill in the blank to make the sentence meaningfully complete - When I was a child, I...... to school everyday instead going by cycle?**

(१) have been walking (२) have walked

(३) had walked (४) walked

प्र.६८. **Choose the word which best expresses the meaning of the given word - Browse.**

(१) Deceive (२) Examine (३) Strike (४) Heal

प्र.६९. **Choose the word which best expresses the meaning of the given word - Garnish**

(१) Adorn (२) Paint (३) Garner (४) Abuse

प्र.७०. **Pick out the most effective word (s) for the given words to fill in the blank to make the sentence meaningfully complete. - Success in this examination depends ...... hard work alone.**

(१) on (२) in (३) at (४) of

प्र.७१. **Exact OPPOSITE of the given word - Artificial**

(१) Red (२) Natural (३) Truthful (४) Solid

प्र.७२. **Choose the word which best expresses the meaning of the given word - Furore**

(१) Excitement (२) Hopeful (३) Tired (४) Shout

प्र.७३. **Pick out the most effective word(s) from the given words to fill in the blank to make the sentence meaningfully complete. - The old Nature versus ...... debate regarding crime continues even today.**

(१) Man (२) Nurture (३) Culture (४) Universe

प्र.७४. **Exact OPPOSITE of the given word - Hostility.**

(१) Courtesy (२) Hospitality (३) Friendliness (४) Relationship

प्र.७५. **Pick out the most effective word(s) from the given words to fill in the blank to make the sentence meaningfully complete. - Man does not live by - alone.**

(१) Food (२) Meals (३) Bread (४) Diet

प्र.७६. **सूचना : खालील प्रश्नांमध्ये दोन विधाने व चार अनुमाने दिलेली आहेत. दिलेली विधाने वास्तवाशी विसंगत वाटली तरीही सत्य समजावीत. दिलेल्या विधानावरून कोणते अनुमान किंवा अनुमाने निघू शकतात किंवा बरोबर आहेत ते ठरवा व त्यासाठीचा अचूक पर्याय निवडा.**

**विधान : सर्व माकडे, रस्ते आहेत. सर्व रस्ते फोन आहेत.**

**अनुमान : (१) काही रस्ते माकडे आहेत. (२) काही फोन माकडे आहेत.**

**(३) काही माकडे फोन नाहीत. (४) सर्व फोन माकडे आहेत.**

(१) फक्त १ व २ बरोबर (२) फक्त १ व ३ बरोबर

(३) फक्त १ व ४ बरोबर (४) फक्त २ व ४ बरोबर

प्र.७७. **सूचना : खालील प्रश्नांमध्ये दोन विधाने व चार अनुमाने दिलेली आहेत. दिलेली विधाने वास्तवाशी विसंगत वाटली तरीही सत्य समजावीत. दिलेल्या विधानावरून कोणते अनुमान किंवा अनुमाने निघू शकतात किंवा बरोबर आहेत ते ठरवा व त्यासाठी अचूक पर्याय निवडा.**

**विधान : बऱ्याच सृजनशील व्यक्ती कलाकार असतात.**

**अनुमान : (१) काही कलाकार सृजनशील आहेत.**

**(२) उच्च दर्जाची सृजनशीलता कलाकार होण्यासाठी आवश्यक आहेत.**

**(३) सृजनशीलतेशिवाय कलाकार बनणे अशक्य.**

**(४) सृजनशील माणूस नक्की कलाकार बनेल.**

(१) फक्त १ बरोबर (२) फक्त २ बरोबर (३) १ व ३ बरोबर (४) फक्त ४ बरोबर

प्र.७८. रवीचा जन्म ५ मे १९९२, सोमवार या रोजी झाला. पहिल्या वाढदिवसापासून तो प्रत्येक वाढदिवसाला चित्रपट पहायला जातो, मात्र वाढदिवस मंगळवारी वा बुधवारी असल्यास त्याला चित्रपटासाठी जाता येत नाही. पहिल्या दहा वाढदिवसात तो किती वेळा चित्रपट पाहू शकणार नाही?

(१) ४ (२) २ (३) ३ (४) ६

प्र.७९. परागचा २५ वा वाढदिवस २१ फेब्रुवारी २००४ रोजी आहे. त्यादिवशी शनिवार असेल, तर परागचा १४ वा वाढदिवस कोणत्या वारी होता?

(१) बुधवार (२) रविवार (३) शुक्रवार (४) शनिवार

प्र.८०. मी सरळ रेषेत चालायला सुरुवात केली, १० किमी अंतर कापल्यानंतर मी उजवीकडे वळून ५ किमी व पुन्हा उजवीकडे वळून ५ किमी अंतर कापले. सद्य:स्थितीत मी मूळ स्थानाच्या वायव्येस आहे, तर मी कोणत्या दिशेस चालावयास सुरुवात केली होती?

(१) पूर्व (२) पश्चिम (३) उत्तर (४) दक्षिण

प्र.८१. एका सकाळी सूर्योदय झाल्याबरोबर शरद ध्वजस्तंभाकडे तोंड करून उभा होता. त्यावेळी ध्वजस्तंभाची सावली त्याच्या बरोबर उजवीकडे त्याच्या ९०° अंशात पडली होती, तर शरदचे तोंड कोणत्या दिशेस असेल?

(१) उत्तर (२) ईशान्य (३) पूर्व (४) दक्षिण

प्र.८२. महेशचे वय सारंगच्या वयाच्या निमपट आहे. ५ वर्षांनंतर सारंगचे वय त्याच्या वडिलांच्या तत्कालीन वयापेक्षा २५ वर्षांनी कमी असेल. त्याच्या वडिलांचे आजचे वय ५५ वर्षे असेल, तर महेशचे आजचे वय किती?

(१) ४५ (२) ३० (३) २५ (४) १५

प्र.८३. स्वप्नील व मकरंद यांच्या आजच्या वयात ६ वर्षांचा फरक आहे. स्वप्नील मकरंदपेक्षा लहान आहे. आणखी ६ वर्षांनंतर दोघांच्या वयात किती फरक असेल?

(१) ६ (२) १२ (३) ३ (४) ९

प्र.८४. एका शेतात काही गायी व काही गुराखी आहेत. गायी आणि गुराखी यांच्या पायाची एकूण संख्या ९८ आहे व डोक्यांची संख्या २६ आहे, तर त्या ठिकाणी गायी व गुराखी किती आहेत?

(१) २४, २ (२) २०, ६ (३) २३, ३ (४) २७, १

प्र.८५. एका रस्त्यावरून काही घोडे व तेवढेच घोडेस्वारही चालत चालले आहेत. काही अंतर कापल्यानंतर त्यापैकी निम्मे, घोडेस्वार घोड्यावर स्वार झाले. आता चालणाऱ्या पायांची संख्या ५० झाली, तर एकूण घोडे किती?

(१) २० (२) ५ (३) ३० (४) १०

प्र.८६. एका मैदानात पांढऱ्या व काळ्या रंगाचे काही ध्वज उभे धरले आहेत. तेथे उभ्या असणाऱ्या गोविंदास पांढरे ध्वज किती आहेत असे विचारले असता तो म्हणाला, 'प्रत्येक पाच ध्वजामधील एक पांढरा आहे व एकूण ध्वज ३५० आहेत,' तर पांढरे ध्वज किती?

(१) ७० (२) ६० (३) ५८ (४) ७२

प्र.८७. एका पार्टीत १२ लोक एकत्र आल्यानंतर प्रत्येकाने इतरांशी एकेकदा हस्तांदोलन केले. कोणत्याही दोन व्यक्तींचे हस्तांदोलन एकदाच होईल. तर एकूण हस्तांदोलनाची संख्या किती होईल?

(१) ५५ (२) १२० (३) ६६ (४) १२२

प्र.८८. एका पिंजऱ्यात १२ सोडून सर्व बदक, ११ सोडून सर्व मोर, १७ सोडून सर्व पोपट आहेत. त्या पिंजऱ्यात तीनच प्रकारचे पक्षी असतील, तर पिंजऱ्यात एकूण किती पक्षी आहेत?

(१) ८० (२) ४० (३) २५ (४) २०

प्र.८९. एका करंडीत पाच रंगाची फुले आहेत. त्यात २३ सोडून सर्व लाल, २५ सोडून सर्व पांढरी, २२ सोडून सर्व पिवळी, १८ सोडून सर्व निळी तर २० सोडून सर्व गुलाबी फुले आहेत. तर त्या करंडीत एकूण किती फुले आहेत?

(१) २७ (२) १०८ (३) ३७ (४) २०४

प्र.९०. सौरभचे घड्याळ दर तासाला ५ सेकंद मागे पडते. रविवारी दुपारी ३ वाजता ते बरोबर लावले होते. बुधवारी दुपारी ३ वाजता ती कोणती वेळ दाखवेल?

(१) ३:०६ (२) २:५४ (३) ३:५४ (४) २:५२

प्र.९१. एका वर्गातील ६ मुलांना सरासरी ५० गुण आहेत व उर्वरित मुलांना सरासरी ७५ गुण आहेत. सर्वांच्या गुणांची सरासरी ६० असल्यास त्या वर्गात एकूण मुले किती आहेत?

(१) ४ (२) १२ (३) १० (४) १५

प्र.९२. प्रत्येक कॅपिटल अक्षराखाली एक अंक लिहिला आहे. अंक ही अक्षरांसाठी सांकेतिक लिपी आहे व अक्षरे अंकांसाठी सांकेतिक लिपी आहे.

| H | C | T | S | B | M | P | K | N | X |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 1 | 7 | 9 | 3 | 6 | 0 | 8 | 5 | 2 |

यावरून PMXNHC अक्षरांसाठी सांकेतिक अंक शोधा.

(१) 026514 (२) 062541 (३) 065241 (४) 056214

प्र.९३. जर HORSE : 82539 तर ROSE : ?

(१) 5239 (२) 2398 (३) 2539 (४) 5238

प्र.९४. रिक्त स्थानांची योग्य पर्यायाद्वारे पूर्तता करा. ......? : nEa :: deB : ......?

(१) neA, DEb (२) Nea, DeB

(३) NEa, dEB (४) NeA, DEb

प्र.९५. जर जॉन भारतीय असेल तर तो पाकिस्तानी नाही, युरोपियन नाही, जॉन भारतीय नाही असे नाही, म्हणून जॉन ...... आहे.

(१) अभारतीय (२) पाकिस्तानी (३) युरोपियन (४) पाकिस्तानेतर

प्र.९६. जर पहिले विधान खरे असेल तर दुसऱ्याची सत्यता तपासा व त्यानुसार योग्य पर्याय निवडा.

**विधान : (१) सर्व सरकारे तटस्थ नसतात.**

**विधान : (२) कोणतेही सरकार तटस्थ नाही.**

(१) सत्य (२) असत्य (३) बहुधा सत्य (४) अनिश्चित

प्र.९७. **विधान : आम्ही मानसिक दडपण कमी करणे या विषयावरील चर्चासत्रे सुरू केल्यापासून उत्पादन खाली आले आहे.**

**गृहितके : (१) मानसिक दडपणाची स्थिती असल्यास उत्पादन वाढते.**

**(२) मानसिक दडपण कमी केल्यास कोणी कामाकडे लक्ष देत नाही असे वाटते.**

**दिलेल्या विधानात कोणते गृहितके अंतर्भूत आहे (आहेत)?**

(१) फक्त १ (२) फक्त २

(३) १ किंवा २ यांपैकी कोणतेही नाही. (४) १ आणि २ दोन्ही आहेत.

प्र.९८. **वर्तुळात वर्तुळखंड काढण्यासाठी खाली लोकसंख्या आणि त्यांचे अंशात्मक कोन दिलेले आहेत. तर जैनधर्मीय लोकसंख्येसाठी असलेला अंशात्मक कोन काढा.**

| समाज | लोकसंख्या | अंशात्मक कोन |
|---|---|---|
| हिंदू | २०,००० | ३००° |
| मुस्लिम | ३,००० | ४५° |
| जैन | ८०० | ......? |
| इतर | २०० | ३° |
| | २४,००० | |

(१) २१° (२) ११° (३) १५° (४) १२°

प्र.९९. **खालीलपैकी कोणती जोडी जुळते आहे?**

(१) दंड चित्र – क्षेत्रफळ मूल्याशी प्रमाणात.

(२) रेखा चित्र – उंची मूल्याशी प्रमाणात.

(३) आयत चित्र – रुंदी मूल्याशी प्रमाणात.

(४) वर्ग चित्र – घन मूल्याशी प्रमाणात.

प्र.१००. **पुढील क्रम पूर्ण करा.** $\frac{5}{7}\ \frac{8}{12}\ \frac{14}{22}\ \frac{26}{42}$ ......?

(१) $\frac{50}{82}$ (२) $\frac{50}{60}$ (३) $\frac{50}{72}$ (४) $\frac{50}{80}$

## प्रश्नपत्रिका संग्रह - ३५ (लेखी परीक्षा उत्तरसूची) यवतमाळ

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ (३) | २ (२) | ३ (३) | ४ (३) | ५ (३) | ६ (२) | ७ (३) | ८ (३) | ९ (२) | १० (३) |
| ११ (४) | १२ (२) | १३ (३) | १४ (२) | १५ (४) | १६ (३) | १७ (३) | १८ (३) | १९ (१) | २० (४) |
| २१ (१) | २२ (३) | २३ (१) | २४ (४) | २५ (३) | २६ (३) | २७ (२) | २८ (२) | २९ (२) | ३० (१) |
| ३१ (१) | ३२ (२) | ३३ (२) | ३४ (२) | ३५ (२) | ३६ (३) | ३७ (२) | ३८ (१) | ३९ (४) | ४० (२) |
| ४१ (४) | ४२ (१) | ४३ (३) | ४४ (१) | ४५ (३) | ४६ (३) | ४७ (२) | ४८ (३) | ४९ (१) | ५० (२) |
| ५१ (३) | ५२ (१) | ५३ (३) | ५४ (२) | ५५ (२) | ५६ (२) | ५७ (२) | ५८ (३) | ५९ (१) | ६० (३) |
| ६१ (१) | ६२ (४) | ६३ (२) | ६४ (१) | ६५ (४) | ६६ (३) | ६७ (४) | ६८ (२) | ६९ (१) | ७० (१) |
| ७१ (२) | ७२ (१) | ७३ (१) | ७४ (३) | ७५ (३) | ७६ (१) | ७७ (१) | ७८ (३) | ७९ (२) | ८० (१) |
| ८१ (४) | ८२ (४) | ८३ (१) | ८४ (३) | ८५ (४) | ८६ (१) | ८७ (३) | ८८ (४) | ८९ (१) | ९० (२) |
| ९१ (३) | ९२ (२) | ९३ (१) | ९४ (४) | ९५ (४) | ९६ (२) | ९७ (३) | ९८ (४) | ९९ (२) | १०० (१) |